**MHTH120090402023**

दाखल तारीख : ०२/०२/२०२३
नोंदणी तारीख : ०२/०२/२०२३
निकाल तारीख : १८/११/२०२५
कालावधी : वर्ष महिना दिवस
०२ ०९ १६

-

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, क. स्तर, बेलापुर, नवी मुंबई यांच्या न्यायालयात**
**{ पिठासीन अधिकारी श्री. भारत एस. गायकवाड }**

( दि.१८ नोव्हेंबर, २०२५ रोजी घोषीत )

**नियमित फौजदारी खटला क्र.२४०/२०२३ निशाणी क्र. १५**

( पोलिस ठाणे तुर्भे येथील ०२६८/२०२२, भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२४ आणि ५०४ सह कलम ३४ अन्वये )

**भाग–अ**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष / फिर्यादी | : | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलिस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे तुर्भे, नवी मुंबई. |
| सादरकर्ते | : | श्री. एच. डी. होळकर सहा. सरकारी अधिवक्ता, सरकार पक्षातर्फे |
| आरोपी क्र.१ | : | शंकर ज्ञानेश्वर चांदणे<br>वय : ३३ वर्षे, धंदा – पेन्ट्री बॉय,<br>रा. : घर क्र. १३३२, इंदिरानगर, बगाडे कंपनीच्या पाठीमागे, तुर्भे एमआयडीसी, तुर्भे, नवी मुंबई. |

| | | |
|---|---|---|
| आरोपी क्र.२ | : | शैलेश ज्ञानेश्वर चांदणे<br>वय : २५ वर्षे, धंदा - नोकरी,<br>रा. : घर क्र. १३३२, इंदिरानगर, बगाडे कंपनीच्या पाठीमागे, तुर्भे एमआयडीसी, तुर्भे, नवी मुंबई. |
| आरोपी क्र. ३ | : | किशोर ज्ञानेश्वर चांदणे<br>वय : २२ वर्षे, धंदा - वाहन चालक,<br>रा. : घर क्र. १३३२, इंदिरानगर, बगाडे कंपनीच्या पाठीमागे, तुर्भे एमआयडीसी, तुर्भे, नवी मुंबई. |
| आरोपी क्र. ४ | : | गोपाळ भिकाजी जाधव<br>वय : ३३ वर्षे, धंदा - वाहन चालक,<br>रा. : घर क्र. १३३२, इंदिरानगर, बगाडे कंपनीच्या पाठीमागे, तुर्भे एमआयडीसी, तुर्भे, नवी मुंबई. |
| सादरकर्ते | : | वकील श्रीमती. वनिता हुनसनाळे |

**भाग-ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १९/१०/२०२२ |
| फिर्याद दाखल तारीख | १९/१०/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०२/०२/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १३/०२/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | १७/०७/२०२५ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | १८/११/२०२५ |
| निकालाची तारीख | १८/११/२०२५ |
| शिक्षा झाल्याची तारीख, शिक्षा झाली असेल तर | -- |

| आरोपींचे विवरण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरोपींचे अ.क्र. | आरोपींचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ साठी खटला सुरू असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
| १ | शंकर ज्ञानेश्वर चांदणे | -- | -- | भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२४ आणि ५०४ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त | - | - |
| २ | शैलेश ज्ञानेश्वर चांदणे | -- | -- | | निर्दोष मुक्त | - | - |
| ३ | किशोर ज्ञानेश्वर चांदणे | -- | -- | | निर्दोष मुक्त | - | - |
| ४ | गोपाळ भिकाजी जाधव | -- | -- | | निर्दोष मुक्त | - | - |

**<u>भाग-क</u>**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार / आरोपीतर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

## अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| अभियोग पक्षाचे साक्षीदार | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरूप | निशाणी क्र. |
| साक्षीदार क्र.१ | श्री. राजु लक्ष्मण सुर्यवंशी | साक्षीदार | निशाणी क्र. १७ |

| | | | |
|---|---|---|---|
| साक्षीदार क्र.२ | श्री. महेश राजेंद्र सुर्यवंशी | फिर्यादी | निशाणी क्र.१३ |
| साक्षीदार क्र.३ | रेखा राजू सुर्यवंशी | साक्षीदार | निशाणी क्र.१४ |

**ब. आरोपी तर्फे साक्षीदार**

| सा.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| सा.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**<u>अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी</u>**

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | |

**ब. आरोपीचा पुरावा**

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयीन पुरावा**

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १ | एक लोखंडी रॉड व एक लोखंडी कडे |

## : न्या य नि र्ण य :

(दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी अधिघोषित)

आरोपीतांवर भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ आणि ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचा आरोप आहे.

१. सरकार पक्षाच्या मते खटल्याची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे आहे :-

दि.१९/१०/२०२२ रोजी रात्री ०९.३० वाजताचे सुमारास फिर्यादी घराजवळच्या कट्टयावर बसण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपी शंकर चांदणे यांनी त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर फिर्यादी व त्यांची आई असे आरोपी शंकर यास जाब विचारण्यासाठी बावडीजवळ गेले. आरोपी शंकर यांनी त्यांना शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली. फिर्यादी यांचे वडील विचारपूस करण्यासाठी आले असता आरोपी गोपाळ यांनी त्यांच्या डोक्यात लोखंडी रॉड मारुन दुखापत केली. आरोपी किशोर चांदणे यांनी हातातील लोखंडी कड्याने फिर्यादीच्या कपाळावर मारहाण करुन दुखापत केली. आरोपी शैलेश चांदणे यांनी त्यांना धक्का-बुक्की केली. आरोपीने फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ केली. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरूध्द पोलिस ठाणे तुर्भे येथे फिर्याद दिली.

२. सदर फिर्यादनुसार गुन्हा नोंद क्र.०२६८/२०२२, भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वये तुर्भे एम. आय. डी. सी. पोलीस स्टेशन येथे नोंदविण्यात आला. तपासी अंमलदार श्री. जयदिप दळवी, पोलिस उप निरीक्षक यांनी घटनास्थळ पंचनामा केला, जप्ती पंचनामा केला, मुद्देमाल पावती तयार केली, जखमीचे वैद्यकीय

प्रमाणपत्र प्राप्त केले, साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने त्याच्याविरूध्द दोषारोप पत्र दाखल केले.

**३.** मी सदरच्या खटल्यात आरोपीविरूध्द निशाणी क्र.३ नुसार भा. द. वि. कलम ३२४ आणि ५०४ सह कलम ३४ या कलमांकरीता दोषारोप निश्चित केला. आरोपीतांनी आरोप अमान्य केले व खटल्याचे संपरिक्षेस सामोरे जाण्याची ईच्छा दर्शवली. आरोपीचे निवेदन निशाणी क्र.४ ते ७ वर नोंदविण्यात आले.

**४.** अभियोग पक्षातर्फे एकूण तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. अभियोग पक्षाच्या पुराव्याअंती आरोपींविरूध्द गुन्हादर्शक पुरावा न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही.

**५.** उपरोक्त अभियोग पक्षाच्या कथनावरून तसेच अभिलेखावरील कागदपत्रावरून खालील मुदद् उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की यातील आरोपीतांनी दि.१९/१०/२०२२ रोजी रात्री ०९.३० वाजताचे सुमारास इंदिरानगर, बगाडे कंपनीच्या पाठीमागे, तुर्भे एमआयडीसी, तुर्भे, नवी मुंबई या ठिकाणी आपसात संगनमत करून आरोपी क्र.४ यांनी साक्षीदार शंकर ज्ञानदेव चांदणे यांच्या कपाळावर लोखंडी रॉडने व आरोपी क्र. ३ यांनी हातातील लोखंडी कड्याने फिर्यादीच्या कपाळावर ठोसा मारून त्यांना आपखुशीने दुखापत केली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला... गुन्हा केला ? | **नाही** |

२. अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी आपसात संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन जाणीवपूर्वक अपमान करुन सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त केले व त्याद्वारे भारतीय दंड विधान संहिता १८६० चे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? ... **नाही**

३. काय आदेश ? ... **अंतिम आदेश प्रमाणे**

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ करिता :</u>**

६. वरील दोन्ही मुद्दे एकाच घटनेशी संबंधीत असल्याने त्यांचा उहापोह एकत्रित करीत आहे.

७. सरकार पक्षातर्फे आरोपींविरूध्द गुन्हा शाबीत करण्याकरीता तीन साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदार क्र.१ राजू लक्ष्मण सुर्यवंशी यांच्या साक्षीत असेल आले आहे की, ते आरोपींना ओळखत नाहीत. दि. १९.१०.२०२२ रोजी काय घटना घडली होती हे त्यांना माहित नाही. ते कामावरुन घरी येत असताना त्यांच्या घराजवळ त्यांना मारहाण झाली होती. सदर साक्षीदारांनी उलट तपासात मान्य केले की, त्यांना आरोपींनी मारहाण केली नव्हती. साक्षीदार क्र. २ महेश सुर्यवंशी हे फिर्यादी असून त्यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि. १९.१०.२०२२ रोजी काय भांडण झाले होते हे त्यांना माहिती नाही. आरोपी यांनी त्यांना व त्यांच्या वडिलांना शिवीगाळ करुन डोक्यात मारहाण केली नव्हती. सदर साक्षीदारांनी सरकार पक्षास सहाय्य केलेले नाही. साक्षीदार क्र. ३ रेखा सुर्यवंशी यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि. १९.१०.२०२२ रोजी काय घटना घडली होती हे त्यांना आठवत

नाही. घटनेच्या दिवशी त्यांच्या पतीच्या डोक्याला व मुलाच्या डोक्याला मार लागला होता असे काही घडले नव्हते. सदर साक्षीदारांनी सरकार पक्षास सहाय्य्य केलेले नाही.

८. साक्षीदार क्र.१ ते ३ हे पिडीत असुन त्यांनी घटनेच्या दिवशी आरोपींनी त्यांना मारहाण व शिवीगाळ केली ही बाब नाकारली आहे. एकंदरीत सदर साक्षीदारांनी त्यांचे साक्षीपुराव्यात त्यांना आरोपीतांनी मारहाण व शिवीगाळ केल्याचे नाकारले आहे. फिर्यादी व साक्षीदार हे पिडीत असून त्यांनी स्वत:च्या केसला सहाय्य केलेले नाही. एकंदरीत सदर साक्षीदाराच्या मते आरोपीतांनी त्यांना घटनेच्या दिवशी मारहाण व शिवीगाळ केलेली नाही. सरकार पक्षातर्फे देण्यात आलेला पुरावा हा आरोपींविरूध्द आरोप शाबीत करण्याइतका सबळ नसल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे आरोपीतांची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.३ साठी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी क्र.१ ते ४ याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२४ आणि ५०४ सह कलम ३४ अन्वयेच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीन कद्बा रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७-अ अन्वये आवश्यक असलेल्या जामीनाची पुर्तता करावी.

४. एक लोखंडी रॉड व एक स्टीलच्या धातुचे कडे मुल्यहीन

असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावावी.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

BHARAT SAMBHAJI GAIKWAD
Digitally signed by BHARAT SAMBHAJI GAIKWAD
Date: 2025.11.20 10:57:59 +0530

**सी.बी.डी. बेलापूर.** **( भारत एस. गायकवाड )**
**दिनांक : १८/११/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**बेलापुर, नवी मुंबई.**